# महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भूमिका
# एक चिकित्सक अभ्यास

---

**१.१ प्रास्ताविक:**

"सर्वे भवन्तु सुखिन: सर्वे संतु निरामय।

सर्वे भद्राणी पश्नन्तु मा काश्चिद्र दु:खमाप्नुयात।।"

ह्या वैश्विक प्रार्थनेचा अर्थ असा आहे की, ह्या विश्वातील सर्व प्राणीमात्र आनंदी रहावीत, सुखी रहावीत आणि सर्व प्रकरांच्या विकारांपासून मुक्त रहावीत.

प्राचीन काळी ऋषीमुनींनी 'वसुधैव कुटुम्बकम' हा संदेश देऊन हे स्पष्ट केले आहे की, संपूर्ण संसार एका कुटुंबाप्रमाणे आहे. आपल्या कुटुंबामध्ये ज्याप्रमाणे आपण प्रत्येक सदस्यांना आदराने वागवतो, प्रत्येकाच्या सुखदु:खाचा विचार करतो त्याचप्रमाणे ह्या विश्वातील प्रत्येक घटकाचा आपण सन्मान केला पाहिजे. प्रत्येक सजीवाला विशेषत: मानवाला नैसर्गिक अधिकरांचा वापर करता यावा.

संपुर्ण मानवजातीमध्ये असे काही घटक आहेत जे रुढी पंरपरेने कमकुवत आहेत किंवा नैसर्गिकरित्याच कमकुवत आहेत जसे लहान मुल, अपंग, वृध्द, महिला, सद्सद् विवेकबुध्दीने विचार केला तर महिला ह्या कमजोर घटकात मोडायला नकोत कारण हे सिध्द झाले आहे की, स्त्रिया मानसिकदृष्टीने पुरुषांपेक्षा अधिक सक्षम असतात. शारिरीक दृष्टीकोनातून देखील विविध कामे एकाच वेळी करण्याची त्यांची क्षमता अधिक असते.

भारतामध्ये राष्ट्रीय स्तरावर ३० ऑगस्ट १९९० रोजी राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम पारित करण्यात आल त्याअन्वये ३१ जाने. १९९२ रोजी आयोगाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय स्तरासोबत महाराष्ट्रातही महिलांच्या हितासाठी एक आयोग

नेमण्यात आला. महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ हा कायदा पारित करण्यात आला. या आधारे २५ जाने १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

**१.२ महिला सक्षमीकरणाचे अर्थ व महत्त्व:**

महिला सक्षमीकरण हे बहुविध, बहुआयामी व बहुपातळ्या (Multifaceted, Multi Dimensional and Multi layered) संकल्पना आहे. भारतातील नियोजन कर्त्यांनी स्त्री व पुरुष यांच्यातील दरी कमी करण्यासाठी रणनिती ठरवली. १९५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टीकोन 'कल्याण' हा होता. १९७० च्या सुमारास 'विकास' होता तर १९९० पासून 'सबलीकरण' हा दृष्टीकोन झाला.

महिलांनी स्वत: मधील सुप्त गुण, बुध्दी, सामर्थ्य व क्षमता ओळखून आत्मविश्वासाने स्वत:ची एक सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे म्हणजे सक्षमीकरण होय. सक्षमीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये स्वत:च्या क्षमतांची जाणीव होऊन विविध उपक्रमांतील  सहभाग वाढविणे, निर्णयक्षमता विकसित करणे, महिलांना विचार स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य असावे. त्यांना त्यांची क्षमता सिध्द करण्याची संधी मिळावी. एकंदरित महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर बनून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात त्यांचा विकास साध्य व्हावा.

**१.३ राज्य महिला आयोग:**

राज्य महिला आयोगाची स्थापना ३१ जाने. १९९३ रोजी महिला व बालकल्याण मत्रांलयाच्या अतर्गत करण्यात आली. हा आयोग म्हणजे शासकीय महिला योजना राबविण्याचे एक सशक्त माध्यम होय. महाराष्ट्रातील महिलांना सुरक्षित जीवन जगणे

व समान स्थान देणे. ह्यासाठी हा आयोग प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील महिलांच्या समस्या सोडविणे, त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे, त्यांचा सामाजिक दर्जा उंचावणे, महिलांना स्वावलंबी बनविणे ह्यासाठी हा राज्य महिला आयोग प्रयत्नशील आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी व अशासकीय सदस्यपदी महिलांच्या कल्याणार्थ कार्य करणाऱ्या महिलांची निवड केली जाते. आयोगाच्या अधिकाऱ्यांमध्ये पोलीस महासंचालक, प्रकल्प अधिकारी, समुपदेशक, विधी तज्ञ यांचा समावेश होतो. तसेच अशासकीय सदस्यांमध्ये अनुसूचित जातीमधून एक व अनुसूचित जमातीमधून एक सदस्य असणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग महाराष्ट्रातील महिलांना सेवा देण्यास बांधील आहे. घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, घटस्फोट, कायदेविषयक सल्ला, आधारगृहे, समुपदेशन, पोलीस सेवा, वैद्यकीय सेवा या आयोगामार्फत गरजू महिलांना दिल्या जातात.

**१.४ महिलांच्या विकासातील समस्या व अडथळे:**

प्राचीन कालखंडापासून संकुचित सामाजिक विचारधारेतून महिलांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने निर्माण झालेली आहेत. आजही महिलावर्ग या बंधनातून पूर्णपणे मुक्त झालेला नाही. महिला दुर्बलीकरणाची कारणे विशेषत: बालविवाह, हुंडापध्दती, सतीप्रथा, विधवा विवाह बंदी, आर्थिक परावलंबित्व इत्यादी जुनाट सामाजिक रुढी परंपरांनी महिलांच्या स्थितीचा दर्जा खालावलेला आहे. ह्याच कारणांमुळे देशातील महिलांचे स्थान दुय्यम दर्जाचे होते. आज २१ व्या शतकात देखील शिक्षण, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील महिलांचे स्वातंत्र्य सोडता सामाजिक क्षेत्रात फारसा क्रांतिकारक बदल झालेला दिसून येत नाही. आज ही विविध

कारणांमुळे महिलांवर अत्याचार होत आहेत. स्त्रीभ्रुणहत्या तर आज भारतासमोरील सर्वात मोठी सामाजिक समस्या म्हणून समोर आलेली आहे.

आज कुटुंबातील जबाबदाऱ्या पार पाडताना आर्थिक जबाबदारी स्वीकारत बहुसंख्य महिला बाहेर पडतात. कौटुंबिक हिंसाचार कायदा-२००५ मुळे कुटुंबातील स्त्रियांना सरंक्षण मिळण्यास मदत झाली. शारिरीक व मानसिक अत्याचार २०१३ हा कायदा स्त्रियांना कार्यालयाच्या ठिकाणी संरक्षण देतो.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे पुर्ण झाली तरी स्त्रियांच्या समस्या आधिकच गुंतागुंतीच्या बनल्या आहेत. ह्याचे एकमेव मुळ कारण म्हणजे समाजांची मानसिकता जोपर्यंत ही मानसिकता बदलणार नाही तो पर्यंत स्त्री ला संघर्ष करत रहावा लागणार.

महिला आयोगाची निर्मिती स्त्रियांना समानतेचा हक्क, न्याय, संरक्षण मिळवून देण्यासाठी करण्यात आली आहे. हा आयोग महिलांच्या समस्यांना आळा घालण्यासाठी सशक्त माध्यम आहे.

## १.५ संशोधनाची आवश्यकता :

जिच्या हाती दोरी ती जगाला उद्धारी असे जरी म्हटले जात असले तरी आजही महिलांना समाजात दुय्यम स्थान मिळते. स्त्रियांना दास्यत्वातून मुक्त करून त्यांची उन्नती व्हावी यासाठी भारतात ब्रिटीश काळापासून अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. स्त्रियांच्या रक्षणासाठी, सुरक्षिततेसाठी, आत्मसन्मानासाठी व विकासासाठी अनेक कायदे निर्माण करण्यात आले आहेत. शासकीय योजना निर्माण करण्यात आल्या. हे सर्व कायदे व योजनांची अंमलबजावणीही करण्यात आली. या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून समाजातील स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय दर्जाच बदलणे आवश्यक

होते. एकाही स्त्रीवर शारीरिक व मानसिक अत्याचार व्हायला नको होते. आज स्त्रीला दुर्बल घटकामध्ये गणले गेले नसते व तिला आरक्षणाचीही गरज पडली नसती, परंतु भारताची राज्यघटना व कायदे हे समानतेचे द्योतक आहेत. म्हणजेच स्त्री व पुरुषांची समानताराज्यघटनेला अभिप्रेत आहे. भारतीय संविधानामध्ये कलम १४ ते ३० मुलभूत अधिकार, कलम ५१ अ मुलभूत कर्तव्य व कलम ३६ ते ५० मार्गदर्शक तत्वे यामध्ये लिंग निरपेक्षता म्हणजेच स्त्री पुरुष यांना समान दर्जा, समान वेतन, समान संधी प्राप्त व्हावी यासंबंधी तरतूदी आहेत. तसेच सर्व धर्मग्रंथात देखील स्त्रियांचा सन्मान व संरक्षणासाठी नियम दिले आहेत. परंतु, वास्तवात परिस्थितीमध्ये प्रचंड प्रमाणात विरोधाभास असल्याचे दिसून येते.

**१.६ संशोधनाची उदिष्टे:**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. भारतातील महिलांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी, महिलांना दिशा देणारी, संरक्षण देणारी, समान हक्क व सन्मान देणारी राजकीय व प्रशासकीय यंत्रणेचा अभ्यास करणे.

२. राज्य महिला आयोग व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये चांगले हितसंबंध कसे निर्माण करता येईल. जेणेकरुन हा आयोग महिलांसाठी अधिक क्रियाशील राहिल का याचा अभ्यास करणे.

३. महिलांच्या कायद्यातील अंमलबजावणीमध्ये राज्य महिला आयोगाची भूमिका अभ्यासणे.

४. राज्य महिला आयोगाच्या विविध कार्यांचा व कार्यपध्दतींचा अभ्यास करणे.

५. राज्य महिला आयोगाच्या अधिकार क्षेत्राचा अभ्यास करणे.

६. महिला सक्षमीकरणामध्ये राज्य महिला आयोगाचा दृष्टीकोन अभ्यासणे.

७. केंद्रीय महिला आयोगाचे महाराष्ट्र राज्य महिला आयोगास मिळणाऱ्या सहयोगांचा, मार्गदर्शन आदीचा अभ्यास करणे.

८. राज्य महिला आयोगाने हाताळलेल्या काही निवडक दावे (Cases) चा संपूर्ण माहितीसह अभ्यास करणे.

**१.७ संशोधनाची गृहितकत्ये:**

पुढील अभ्यास करण्यासाठी दिशादर्शक म्हणून या संशोधनात पुढील गृहितकत्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोग एक सशक्त माध्यम आहे.

२. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण कमी करण्यामध्ये राज्य महिला आयोगाचे महत्त्वाचे योगदान आहे आहे.

३. समानतेचे तत्त्व दृढतेने प्रस्थापित करण्यामध्ये  राज्य महिला आयोग महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

४. महिला संरक्षण व विकासामध्ये राज्य महिला आयोग सक्तीने प्रयत्न करित आहे.

५. महिलांच्या संरक्षण विषयक तक्रारींचे निराकरण राज्य महिला आयोगाद्वारे केले जाते. व शासनावर महिलांविषयक धोरणास प्राधान्य देण्यासाठी दबाव आणण्याचे कार्य देखील राज्य महिला आयोग करते.

## १.८ संशोधन पद्धती :

महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे कार्य व कार्यपद्धती विषयी अध्ययन करण्याच्या दृष्टीने व महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा संशोधन विषय हाती घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनाद्वारे अचूक निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी व संशोधन पद्धतीमध्ये शास्त्रीयता व अद्यावतता आणण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

### अ) तथ्य संकलन पद्धती :

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलनास अतिशय महत्वाचे स्थान असते. तथ्य हे वास्तवाचे दर्शन घडवते, ज्याचे अवलोकन किंवा अनुभव प्रत्येकाला घेता येऊ शकतो. तथ्य म्हणजे असे निरक्षण आहे की, ज्याच्या ज्ञानेंद्रियाद्वारे अनुभव घेता येतो. तथ्य संकलनावरच सामाजिक संशोधनाची परिणामकारकता अवलंबून असते.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची महिला सबलीकरणातील भूमिकेचे अध्ययन करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक अशा दोन्हीही स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे.

### १) प्राथमिक स्त्रोत :

प्रथमिक तथ्य संकलनासाठी अवलोकन, निरिक्षण, मुलाखत या स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. राज्य महिला आयोगाच्या सदस्य, अध्यक्ष आदी संबंधित इतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मुलाखतीद्वारे तथ्य संकलन करण्यात येणार आहे. तसेच राज्य महिला आयोगाने हाताळलेल्या प्रकरणांचा प्रत्यक्षात संबंधित महिलांची मुलाखतीद्वारे तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

**२) द्वितीयक स्त्रोत:**

तथ्य संकलनासाठी द्वितीयक स्त्रोतामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, शासकीय प्रकाशने, शासकीय अवहाल, मासिके, वर्तमानपत्रे तसेच संगणकीय साधने जसे इंटरनेट, ई-मेल इ.चा उपयोग करण्यात येणार आहे.

**ब) माहिती प्रक्रियाकरण:**

तथ्य संकलनाच्या विविध साधनांचा व तंत्रांचा अवलंब करुन संकलित करण्यात आलेली माहिती तथा आकडेवारी ही विखुरलेल्या स्वरुपात असते. केवळ तथ्यांचे संकलन करणे म्हणजे संशोधन नसते तर प्राप्त करुन घेतलेल्या तथ्यांचे सुयोग्य असे वर्गीकरण करुन संशोधन उद्दिष्टापर्यंत पोहचू शकेल या प्रमाणे माहितीचे संस्करण व वर्गीकरण करणे म्हत्त्वाचे असते यासाठी प्रामुख्याने खालील पध्दतींचा अवलंब करण्यात येणार आहे.

१. विश्लेषणात्मक पध्दती.

२. आलेख पध्दती.

३. संगणकीकरण.

**१.९ संशोधनाचे अभ्यास क्षेत्र :**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून राज्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीकोनातून अनेक पाऊले उचलण्यात येत होती. त्यातील एक म्हणजे महिला व बालकल्याण मंत्रालयातर्फे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची निर्मिती होय. महाराष्ट्रातील राज्य महिला आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. हा आयोग महाराष्ट्रातील महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी कोणकोणते प्रयत्न करते, आयोगाच्या प्रमुख कार्यपद्धती कोणत्या, महाराष्ट्रातील महिलांना या

आयोगाची कितपत मदत झाली व त्याचे काय परिणाम झाले इत्यादी गोष्टींचे संशोधन या शोधप्रबंधामार्फत करण्यात येणार आहे.

**१.१० साहित्याचा आढावा:**

महिलांच्या हक्कांच्या सरंक्षणासाठी अनेक कायदे बनविण्यात आले आहेतज्ञ जसे सतीबंदी कायदा-१९३९,१९८७, बालविवाह प्रतिबंधक कायदा-१९५४, हिंदु विवाह कायदा १९५५, पोटगी कायदा १९७६, राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९०, कौटुंबिक हिंसाचार कायदा इत्यादी असे अनेक कायदे अस्तित्वात आले.

१. भारताने मानवी हक्क आंतर राष्ट्रीय जाहिरनाम्यावर इ.स. १९४८ मध्ये स्वाक्षरी केली व त्यातील स्त्रियांच्या मानवी हक्काविषयी मान्यता दिली.
२. CEDAL-Convention on Elimination of Discrimination of All Women ह्या आंतरराष्ट्रीय Convention वर ही हस्ताक्षर केले आहेत.

**१.११ प्रकरण मांडणी:**

महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भुमिका -एक चिकीत्सक अभ्यास या संशोधन विषयाचा पुढील सहा प्रकरणांमध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण १- प्रस्तावना**

संशोधन प्रबंधाच्या पाहिल्या प्रकरणामध्ये अभ्यास विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली आहे. मानवी हक्क व महिला या विषयावर विश्लेषण करण्यात येणार

आहे. मानवी हक्कांचा उगम, स्वरुप, व्याप्ती येथे स्पष्ट करण्यात येणार आहे. तसेच मानवी हक्काचे संकल्पनात्मक विवेचन करण्यात येणार आहे.

**प्रकरण-२ संशोधन पध्दती व साहित्याचा आढावा**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात येणार आहे. यात संशोधनाचे महत्त्व, समस्या सुत्रण, उद्दिष्टये, गृहितके, तथ्य संकलनपध्दती इत्यादी व संशोधनासंदर्भातील विविध प्रबंध, ग्रंथ, मासिके, लेख यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

**प्रकरण ३ मानवी हक्क व महिला सक्षमीकरण**

आतंरराष्ट्रीय स्तरावर, राष्ट्रीय व राज्य स्तरावर मानवी हक्क संकल्पेनाचा विकास येथे स्पष्ट करण्यात येईल. माहिली सक्षमीकरणाची आवश्यकता, अर्थाचे विश्लेषण, महिलांच्या समस्या व उपाययोजनाची चर्चा येथे करण्यात येणार आहे.

**प्रकरण -४ राज्य महिला आयोगाची रचनात्मक व कार्यात्मक विवेचन**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची रचना, स्वरुप, व्याप्तीचे स्पष्टीकरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची विविध कार्ये व कार्यपध्दतींचा अभ्यास येथे करण्यात येणार आहे. माहिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भुमिका या प्रकरणामध्ये स्पष्ट करण्यात येणार आहे.

**प्रकरण  ५ महिलांच्या सक्षमीकरणातील राज्य महिला आयोगाची भुमिका**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूंचा चिकित्सक अभ्यास व विश्लेषण या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने हाताळलेल्या काही निवडक प्रकरणांचा सखोल अभ्यास व विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच या प्रकरणामध्ये महाराष्ट्र

राज्य महिला आयोगाचे निवडक सदस्यांची मुलाखत घेऊन त्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

**प्रकरण-६ निष्कर्ष व शिफारशी**

महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भुमिका या विषयाचा उद्दिष्ट समोर ठेवून शास्त्रोक्त संशोधन पध्दतीद्वारे संशोधन केल्यानंतर त्यातून समोर येणारे निष्कर्ष या प्रकरणांमध्ये मांडण्यात येणार आहेत.

महिला सक्षमीकरण आणखी क्रियाशील करण्यासाठी अभ्यासपूर्व शिफारशी येथे करण्यात येणार आहेत.

**१.१२ समारोप:**

कुटुंबाच्या, समुदायाच्या, राष्ट्राच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी लिंगभाव समानता आणि महिलांचे सक्षमीकरण अत्यंत आवश्यक आहे. हे बहुसंख्य देशांनी आज मान्य केले आहे. स्त्रियांची लोकसंख्या Half the Universe आहे. विशेषत: भारतामध्ये स्त्रियांच्या विकासासाठी अजून कार्यकुशलतेने प्रयत्न करण्याची गरज आहे. जर देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणावयाचा असेल, देशाला प्रगतीच्या दिशेने वाटचाल करायची असेल तर देशाच्या सर्व कामकाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने सहभाग अतिशय मोलाचा ठरेल.

भारतीय स्त्रियांचा दर्जा जगाच्या, विकसित राष्ट्रांच्या व अशिया खंडातील स्त्रियांच्या तुलनेत आरोग्य, शिक्षण, रोजगार, सत्ता व प्रतिष्ठा या क्षेत्रात कमी आहे. हा दर्जा सुधारण्यासाठी काही ठोस उपाय तसेच कालबध्द कृती कार्यक्रम हे आरोग्य, साक्षरता, शिक्षण, रोजगार या क्षेत्रात राबविले पाहिजेत.

# सारांश (synopsis)

## "महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भूमिका- एक चिकित्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच्.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा


**- : संशोधक :-**

**गीता सांबप्पा गिरवलकर**

लातूर

**- : मार्गदर्शक :-**

**प्रा. डॉ. गोविंद पांडूरंग येडले**

लोकप्रशासन विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी

जि. नांदेड


**जुन - २०१७**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच्.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

# "महिला सक्षमीकरणातील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास"

---


**संशोधकाचे नाव :-** **गीता सांबप्पा गिरवलकर**

विषय : लोकप्रशासन

मो. नं.: ९५०३१०९६४४

प्रवर्ग : खुला

पत्ता : बार्शी रोड, लातूर.

ई-मेल : geetassharma76@ymail.com

---

**मार्गदर्शकाचे नाव :** **प्रा. डॉ. गोविंद येडले**

महाविद्यालयाचे नाव : लोकप्रशासन विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
के. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय,
उमरी, जि. नांदेड

मो. न. : 7448052712

ई-मेल : govindyedle@gmail.com


---